# वॉल्ट डिस्ने

सॅडलबॅक शैक्षणिक प्रकाशन



# वॉल्ट डिस्ने

मराठी अनुवादः सुशील मेन्सन





*वॉल्ट डिस्ने* हे नाव साऱ्या जगाला परिचित आहे. ते *मिकी माऊस*चे निर्माता होते. त्यांनीच कार्टून सिनेमा बनवण्यास सुरुवात केली.



त्यांचे साप्ताहिक टेलीव्हिजन कार्यक्रम लाखो लोक आपल्या कुटुंबियांसोबत एकत्र बसून बघत. आपल्या कौशल्याच्या बळावर वॉल्ट डिस्ने यांनी आपले स्थान कसे निर्माण केले, त्याचीच ही कहाणी आहे.

वॉल्ट डिस्ने यांचा जन्म 1901 साली *शिकागो* शहरात झाला. त्यांना चार भावंडे होती. त्यांचे वडील *एलियास डिस्ने* विविध कामांची कंत्राटे घेत असत.



त्यांची आई *फ्लोरा,* ही लग्नाआधी शाळेत शिक्षिका होती. पण मुलांचे संगोपन करण्यासाठी तिने नोकरी सोडली.


चार वर्षांचा असताना वॉल्ट कुटुंबीयांसोबत *मिसुरी राज्यात* एका शेतावर राहायला गेला.
शेतावर खूप कष्टाची कामे करावी लागत. मुलांनीही कामाची जबाबदारी घ्यावी, याकडे एलियासचा कटाक्ष असे.
वॉल्टच्या दोन मोठ्या भावांना हे नवे आयुष्य रुचले नाही. त्यांनी घरातून पलायन केले आणि ते पुन्हा शिकागोत राहायला गेले.
चल रे, सुकड्या!
*रॉय* हा आठ वर्षांनी मोठा असलेला भाऊ मात्र वॉल्टचा चांगला मित्र होता.
बघ रॉय, मी सुकड्याचं चित्र काढलंय.
अरे व्वा!
वॉल्टच्या वडिलांनी आपल्या बगिचांमधील सफरचंदे विकून चरितार्थ चालवून पाहिला. पण त्यात त्यांना यश आले नाही. शेवटी शेत विकून ते *कॅन्सस* शहरात राहायला गेले.


कॅन्ससमध्ये डिस्ने यांनी 2,000 घरांमध्ये वृत्तपत्र टाकण्याचे कंत्राट घेतले. रॉय आणि वॉल्ट कुठल्याही मोबदल्याविना हे काम करू लागले. इतर मुलांना हेच काम करण्यासाठी आठवड्याला तीन डॉलर मिळत असत.
रॉय आणि वॉल्ट वृत्तपत्र घरोघरी टाकण्यासाठी दररोज पहाटे 3:30 वाजता उठत.
चल, उठ वॉल्ट.
मी आराम करून थोडी उब मिळवतो.
हिवाळ्यात हिमवर्षावामुळे वॉल्टचे नाक चोंदत असे.
किती ही थंडी!
जाग आल्यावर घाईघाईत वृत्तपत्रे घरोघरी टाकून वॉल्ट शाळेत जाई.
वडिलांच्या कामातून कधी सुटका होईल, त्या दिवसाची वाट तो पाहात होता.


एक वर्ष झाले. रॉयने हायस्कूलचे शिक्षण पूर्ण केले. मग तो आपल्या मोठ्या भावांसारखंच घर सोडून निघून गेला.
मलासुद्धा तुझ्यासोबत येता आलं असतं तर!
हो, पण आधी तुझं शाळेचं शिक्षण पूर्ण कर.
वॉल्ट शाळेत जाऊ लागला, वृत्तपत्रेही टाकू लागला. शनिवारी तो कॅन्सस कला संस्थेत कला विषय शिकण्यासाठी जाऊ लागला.
खूप छान, वॉल्ट!
वॉल्टच्या मित्राच्या वडिलांचे एक सिनेमा थिएटर होते. कधीकधी वॉल्टचे वडील त्याला या मित्रासोबत सिनेमा बघायला जाऊ देत. .
त्यांनी जे सिनेमे पाहिले ते मूक होते. संवाद बोलताना अभिनेत्यांचे ओठ हलत पण ऐकू येत नसे. पडद्याच्या तळाला संवाद लिहिलेले असत. ते वाचून अभिनेता काय बोलला, हे कळत असे.
वॉल्टने या सिनेमांमधील काही विनोद वापरून एक कार्यक्रम बनवला आणि लोकांसमोर सादर केला.


1917 साली अमेरिका पहिल्या महायुद्धात उतरली. एलियास डिस्ने यांनी वृत्तपत्राचा व्यवसाय बंद केला. त्यांनी आपला पैसा शिकागोतील एका जेली फॅक्टरीत गुंतवला आणि ते सारे शिकागोला गेले. वॉल्ट शाळेचे वर्ष पूर्ण करण्यासाठी मागेच राहीला.
उन्हाळ्यात त्याने *सांता फे रेलरोड*वर वृत्तपत्रांसोबतच खाण्याचे पदार्थही विकले.
पेपर घ्या. कँडी घ्या, कोल्ड्रिंक घ्या.
पानगळीच्या दिवसांत त्याने शिकागोच्या जेली फॅक्टरीत काम केले. त्याने रात्री कलेचे शिक्षण देण्याचा वर्गही सुरू केला.
एकदा रॉय प्रशिक्षणासाठी नौदलाच्या शिबिरात जाताना वाटेत शिकागो शहरात थांबला. आपण रेल्वे स्टेशनवर भेटू, असे रॉयने वॉल्टला कळवले.
तुला बघून बरं वाटलं. चांगलाच उंच झालायस.
दोघा भावांनी खूप गप्पागोष्टी केल्या. मग ट्रेन सुटण्याची वेळ झाली आणि रॉय निघाला.
ट्रेन अर्ध्या मिनिटात सुटेल. चला दोघं.
NY
सोळा वर्षीय वॉल्ट हा सुद्धा शिबिरात चाललाय असा अधिकाऱ्याचा गैरसमज झाला. त्यावरून वॉल्टला एक कल्पना सुचली.



नौदलात भरती होण्यासाठी वयवर्षे 18 पूर्ण असावी लागतात, हे वॉल्ट जाणत होता. पण *रेड क्रॉस रुग्णवाहिनी* तुकडीत 17 वर्षे वयाच्या स्वयंसेवकांना घेत असत.
नाव, वय सांगा.
वॉल्टर डिस्ने, सतरा.


पण एक अडचण होती. कागदपत्रांवर त्याच्या आईवडीलांपैकी कुणा एकाची सही हवी होती. वडिलांनी सही दिली नसती, पण आई तयार झाली.
तुझ्या भावांसारखं पळून जाण्यापेक्षा हे ठीक आहे. तुझा ठावठिकाणा तरी कळेल.


वॉल्ट *कनेक्टिकट* राज्यात प्रशिक्षण घेत असताना युद्ध समाप्त झाले. त्याच्या सुदैवाने, त्याला वर्षभर फ्रान्समध्ये मदतकार्य करण्यासाठी पाठवण्यात आले.


1919 साली वॉल्ट अमेरिकेत परतला. चित्रकार म्हणून नोकरी मिळवण्यासाठी तो कॅन्सस शहरात गेला.
तिथे त्याला *ग्रे जाहीरात कंपनीत* नोकरी मिळाली. तिथेच त्याची *उब इवर्क्स* या तरूण चित्रकाराशी भेट झाली.
पण डिसेंबरमध्ये मंदीमुळे दोघांचीही नोकरी गेली.
आपण स्वतःचा व्यवसाय सुरू करू. जाहिराती, लेटरहेड आपण बनवतोच.
जरूर, का नाही!
एका छोट्या वृत्तपत्राने त्यांचे काम करण्याच्या अटीवर त्यांना आपल्या कार्यालयातील जागा वापरायला दिली. वॉल्टने काही सामान खरेदी केले.
दोन नव्या जाहिराती मिळाल्या आज.
काही महिन्यांनंतर त्यांना व्यवसायात नुकसान झाले.
त्यांचा व्यवसाय चालला नाही. मग त्यांना *कॅन्सस फिल्म सिटी जाहीरात कंपनीत* नोकरी असल्याचे कळले.
आठवड्याला चाळीस डॉलर! आपल्या दोघांच्या कमाईपेक्षा जास्त आहेत हे!
तू कर ती नोकरी. मी इथेच राहातो.
नंतर कंपनीने उबलाही नोकरी दिली.


कॅन्सस फिल्म जाहीरात कंपनीत वॉल्ट वेगवेगळे भाग वापरून हालचाल करणारे कार्टून बनवायला शिकला.
फावल्या वेळात त्याने एक कॅमेरा उधार घेऊन स्वत:ची कार्टुन चित्रे बनवली. नंतर ही चित्रे त्याने एका स्थानिक थिएटरला विकली.
या विनोदी कार्टुनमध्ये त्याने वेगवेगळे भाग वापरण्याऐवजी चित्रे काढून हालचाल दाखवली.
पुरेसा पैसा जमल्यावर वॉल्टने *लाफ-ओ-ग्राम* नावाची स्वत:ची कंपनी सुरू केली.
Laugh-O-grams Films Inc.
पण वर्षभरातच, या कंपनीचे दिवाळे निघाले.
वॉल्टवर दिवसातून एकच वेळ, तेसुद्धा उधारीवर, जेवण्याची पाळी आली. रात्री तो आपल्या कार्यालयातच झोपू लागला.
वॉल्ट मनाने खचून गेला होता.


अखेरीस, वॉल्टने आपला कॅमेरा विकला. आलेल्या पैशातून त्याने काही कर्जे चुकवली आणि तो *कॅलिफोर्नियाला* गेला. त्याला सिनेमा व्यवसायात उतरायचे होते. शिवाय रॉय तिथे लष्कराच्या हॉस्पीटलमध्ये उपचार घेत होता.
कॅन्ससहून तो फक्त त्याचे कपडे आणि लाफ-ओ-ग्राममध्ये बनवलेला *द ॲलिस कॉमेडीस* हा अर्धवट बनलेला सिनेमा घेऊन आला.
लॉस एंजल्समध्ये त्याला त्याचे काका, *रॉबर्ट डिस्ने* यांची खोली भाड्याने राहायला मिळाली. मग एका मोठ्या सिनेमा कंपनीत तो काम शोधू लागला.
काम मिळाले नाही म्हणून त्याने एक जुना कॅमेरा भाड्याने घेऊन काकांच्या गॅरेजमध्येच एक स्टुडिओ उभारला.
शेवटी, *द ॲलिस कॉमेडीस* सिनेमा एकाने विकत घेतला. रॉयला ही बातमी सांगण्यास वॉल्ट आतुर झाला.
न्यूयॉर्कचा एकजण बारा *ॲलिस* सिनेमे घेतोय. प्रत्येक सिनेमाला 1500 डॉलर देतोय. तू माझा भागीदार बनशील, रॉय?



रॉयची तब्येत बरी झाली. मग रॉय आणि वॉल्ट यांनी काकांकडून पाचशे डॉलर उसने घेऊन एक छोटेसे कार्यालय थाटले. दोघे *ॲलिस* सिनेमावर काम करू लागले.
वॉल्टने एका साध्याशा पार्श्वभूमीवर एका लहान मुलीचे फोटो काढले. त्यावरून त्याने कार्टून चित्रे काढली आणि चित्रांचे फोटो काढून ते फिल्मवर छापले.
जुना कॅमेरा स्थिर गतीने फिरवण्यात रॉयला अडचण जाणवू लागली.
*ॲलिस,* सिनेमा कधी हळू तर कधी जलद पळतोय. आपल्याकडे एक व्यावसायिक कॅमेरामन हवा.
कार्टुन सिनेमा बनवण्यात मदत करण्यासाठी वॉल्टने *उब इवर्क्स*ला कॅन्ससमधून बोलावले.
बघ कोण आलंय!
त्यांनी एकामागोमाग एक अनेक *ॲलिस* सिनेमे बनवले. मिळालेल्या नफ्यातून त्यांनी अधिक चांगली उपकरणे आणि साधने खरेदी केली.
कडधान्य मी आवडीने खातो. यापेक्षा जास्त काही परवडणारही नाही.
मग वॉल्ट आणि रॉय यांनी एक घर भाड्याने घेतले.


वॉल्टच्या कार्यालयात *लिली बाऊंड* ही महिला कर्मचारी होती. कार्यालय बंद झाल्यावर वॉल्ट तिला मोटारीने तिच्या घरी सोडत असे.
आत नाही का येणार?
अंगावरच्या जुन्या कपड्यांमध्ये लिलीच्या कुटुंबियांना भेटण्यात वॉल्टला संकोच वाटे.
एके दिवशी....
रॉय, एक नवा सूट खरेदी करण्यासाठी मी आपल्या कंपनीच्या खात्यातून काही पैसे काढतोय.
अरे, मलासुद्धा नवा सूट हवाय. मी आणि *एड्ना* लग्न करतोय.
शेवटी, मनासारखे कपडे घालून तो एकदा लिलीच्या घरी गेला.
त्यांची मैत्री घनिष्ट झाली. त्यांनी एक मोटार खरेदी करायचे ठरवले. रॉयचे लग्न झाल्यावर वॉल्टला एका सहकाऱ्याची गरज जाणवू लागली.
लिली, आधी काय खरेदी करू, मोटार की अंगठी?
जुलै 1925 मध्ये त्यांनी लग्न केले.



वॉल्टने आपली कंपनी *हायपरीयॉन अॅव्हेन्यू* येथील एका मोठ्या स्टुडिओत हलवली. मग वॉल्ट आणि लिलीयन यांनी त्यानजिकच एक घर खरेदी केले.
तीन वर्षांनंतर, *अॅलीस इन कार्टुनलँड*चा प्रभाव ओसरला आणि एक नवे पात्र जन्माला आले.
हा बघा, *ओसवाल्ड, नशीबवान ससा*, आपल्या नव्या कार्टुन सिनेमासाठी.
ओसवाल्ड खूप लोकप्रिय झाला.
एका कार्टुनचे आपल्याला 2,250 डॉलर मिळतात. पण आपला खर्च त्यापेक्षा जास्त होतो.
जास्त मोबदल्याची मागणी करण्यासाठी वॉल्ट लिलीयनसोबत न्यूयॉर्कला गेला.
माफ कर वॉल्ट. ओसवाल्ड कार्टुनसाठी मी तुम्हाला 1,800 डॉलर देऊ शकतो.
पण आमचा खर्च यापेक्षा जास्त होतोय.
ओसवाल्ड कार्टुनचा मालकी हक्क माझ्याकडे आहे. तुझ्या चार चित्रकारांशी मी करार केला आहे. तू मान्य केलं नाहीस तर ते थेट माझ्यासोबत काम करतील.



वॉल्टने अमान्य केले. आपले चित्रकार आपल्याशी एकनिष्ठ नाहीत, हे पाहून त्याला वाईट वाटले.
लिली, आता आपण जे काही करू त्याचा मालकी हक्क आपल्यापाशीच राहील.
लॉसएंजल्सला परतण्याआधी वॉल्टने रॉयला एक संदेश पाठवला.
TELEGRAM
ROY: EVERYTHING O.K. COMING HOME. WALT
असा खोटा संदेश का पाठवलास?
मी तो खरा करेन.
पोहोचण्यापूर्वी वॉल्ट पुन्हा उत्साहीत झाला. तो ओसवाल्डऐवजी एका नव्या पात्राचा विचार करू लागला.
किती गोड! पण त्याचं नाव बदल.
MORTIMER MOUSE
लिलीयनने त्या कार्टुन उंदरासाठी मिकी हे नाव सुचवले.


स्टुडिओत परतून वॉल्ट नव्या मिकी माऊस कार्टुनवर काम करू लागला.
याच काळात, वॉर्नर ब्रदर्सने *द जाझ सिंगर* हा सिनेमा काढला. हा पहिलाच बोलपट होता ज्याला चांगले यश मिळाले.
M-A-M-M-y M-A-M-M-y
संगीतकार *विल्फ्रेड जॅक्सनने* *मिकी माऊस* कार्टुन सिनेमासाठी *स्टीमबोट विली* नावाची संगीतरचना केली.
सिनेमाची फिल्म सेकंदाला 24 फ्रेम या गतीने चालण्यासाठी *मेट्रोनोम* या उपकरणाचा वापर केला. सिनेमा पूर्ण तयार झाल्यावर त्याचे संगीत तयार झाले. मग हालचाली आणि संगीत यांचा मेळ साधला.


बऱ्याच प्रयत्नांअंती, वाद्यवृंद आणि रेकॉर्डिंगसाठी कंपनी मिळाली. मिकी माऊसला वॉल्टने स्वतःचा आवाज दिला.
*स्टीमबोट विली* सिनेमाला अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. मग वॉल्टने मिकी माऊसचे आणखी चार बोलपट तयार करून देशभर प्रसारीत केले.
मिकी माऊसची लोकप्रियता वाढू लागली तसे सिनेमाचे वितरक वॉल्टकडून अवास्तव अपेक्षा करू लागले. त्यांनी वॉल्टला सूचना दिली की ते वॉल्टच्या डिस्ने स्टुडिओतील उब इवर्क्सला मोठी रक्कम देऊन त्यांच्या स्वतःच्या कंपनीत नोकरीला ठेवतील. वॉल्टने त्यांच्या मागण्यांना भीक घातली नाही.
मिकीची चित्रं काढायला दुसरा कुणीतरी बघू.
मिकी माऊसचं यश हे एकट्या चित्रकारावर अवलंबून नाही. त्यासाठी गोष्ट सादर करण्याचं उत्तम कौशल्य आवश्यक असतं, जे तुझ्याजवळ आहे.
काही वर्षांनंतर, उब डिस्ने स्टुडिओत परतला.


सिनेमाचे शुटींग करताना वॉल्टचे लवकर समाधान होत नसे.
तो प्रत्येक गोष्ट अचूकपणे करायला बघे. त्यासाठी खडतर मेहनत घेई. यामुळे त्याची तब्येत बिघडू लागली.
परत एकदा कर.
शेवटी त्याला डॉक्टरकडे जावे लागले. डॉक्टरने त्याला दीर्घ सुट्टीवर जाण्याचा सल्ला दिला.
सुट्टीहून परतल्यावर त्याने पुन्हा पहिल्यासारखे कामाला जुंपून घेतले.
1930 साली डिस्ने स्टुडिओचा पसारा वाढला. त्यातील कर्मचाऱ्यांची संख्या वाढली. मिकी माऊससोबत आणखी नवी पात्रे आली.
1931 साली *प्लुटो* आला. त्यानंतर *गूफी* आला.
एकदा वॉल्टने रेडिओवर *क्लेरेन्स नॅश* याचा आवाज ऐकला. तो *मेरी हॅड अ लिटल लॅंब* ही कविता बदकाच्या आवाजात म्हणत होता.


वॉल्टने नॅशला आपल्या स्टुडिओत बोलावले आणि आपल्या सिनेमातील कार्टुनला आवाज देण्यास सांगितले.
नॅशने दिलेल्या आवाजावरून *डोनाल्ड डक* नावाचे पात्र तयार झाले. 1934 साली ते पहिल्यांदा पडद्यावर आले.
कोण मी? नाही, माझं पोट दुखतंय.
CHIP and DALE
काही वर्षांनंतर, डोनाल्डचे तीन पुतणे यात सामील झाले. त्यांनी *डेझी बदक* आणि *चिप* व *डेल* नावाच्या दोन खारींची कार्टून चित्रे तयार केली.
मिकी माऊस सिनेमा बनवतानाच डिस्ने स्टुडिओ *सिली सिम्फनीज* मालिकेतील सिनेमेही बनवत होते.
1929 साली यांतीलच एका सिनेमात रात्री कबरीतून उठून नाचणारे मानवी सापळे दाखवले होते.
1931 साली डिस्नेने दोन अकादमी पुरस्कार जिंकले. एक *फ्लॉवर अँड ट्री* या सिली सिंफनीसाठी आणि दुसरा मिकी माऊससाठी.


वॉल्टची सर्वाधिक प्रसिद्ध सिली सिम्फनी होती *द थ्री लिटल पिग्स.*
ती त्या काळात बनली होती जेव्हा बरेच लोक बेरोजगार होते.
18 MILLION JOBLESS:
ROOSEVELT URGES AMERICANS TO STICK TOGETHER
*व्हू इज अफ्रेड ऑफ द बिग बॅड वुल्फ बिग बॅड वुल्फ बिग बॅड वुल्फ....*
हे गाणे अमेरिकी लोकांच्या मनावर आनंदाचा शिडकावा करत असे. सिनेमा बघून थिएटरमधून बाहेर आल्यावर ते हेच गाणे गुणगुणत असत.


कार्टुन चित्रे तयार करायला खूप कष्ट पडत. एका सेकंदाला 24 फ्रेम याप्रमाणे सात मिनिटांच्या कार्टुन सिनेमासाठी तब्बल 10,000 चित्रे काढावी लागत. प्रत्येक चित्रात आधीच्या चित्रापेक्षा बारीकसा फरक असे.
सिनेमातील महत्त्वाचे दृश्य मुख्य चित्रकार काढत. त्यांचे मदतनीस चित्रकार चित्रातील इतर बाबी काढत. बारी सारी कामे तंत्रज्ञ, दिग्दर्शक, लेखक आणि संगीतकार करत.


*वेब स्मिथ* नावाचा एक चित्रकार कच्ची चित्रे आपल्या समोरच्या भितीवर चिकटवत असे. सर्व चित्रे एकाच वेळी दिसत असल्यामुळे त्याला कथेचा अंदाज येत असे.
वेब तू कार्यालयाच्या नव्याकोऱ्या भिंती खराब करतोयस.
मग मनाशी काही विचार करून वॉल्टने चित्रे चिकटवण्यासाठी फलक मागवले. यातूनच *स्टोरीबोर्ड*चा जन्म झाला.
मिकी माऊसचा जन्म याच बोर्डवर झाला.
दरम्यान, मिकी माऊसची प्रसिद्धी साऱ्या जगात पसरली.
Mickey Mouse
1935 साली युनोने वॉल्ट डिस्नेला एक पदक दिले. त्यांनी मिकी माऊसला *आंतरराष्ट्रिय सद्भावना प्रतिक* म्हणून त्याचा सन्मान केला.
मिकी माऊस सिनेमे हे काही मिनिटांचे लघुपटच होते. थिएटरमध्ये मोठे सिनेमे दाखवण्याआधी ते दाखवत असत.
हो बरोबर! पण आता आम्ही हिमगौरीच्या कथेवर आधारित एक पूर्ण लांबीचा कार्टुन सिनेमा बनवणार आहोत.


*स्नो व्हाइट (हिमगौरी)* सिनेमा 17,50,000 लाख डॉलरमध्ये पाच वर्षे कालावधीत बनला. 1937 पर्यंत डिस्नेची कर्मचारीसंख्या 150 वरून 750 झाली.
डिस्ने स्टुडिओत एक नवीन प्रकारचा कॅमेरा बनवण्यात आला. लोकांना चित्रातील खोलीचे आकलन होण्यात त्याचा उपयोग होत असे.
लोकांनी वॉल्टला मूर्खात काढले. पण वॉल्टचा स्वत:वर विश्वास होता. *स्नो व्हाइट* सिनेमाला 85 लाख डॉलरची कमाई झाली. या यशामुळे वॉल्टला एक नवा स्टुडिओ उभारण्यास बळ मिळाले.
1940 साली नवा स्टुडिओ बनून तयार झाला. तोवर कर्मचाऱ्यांची संख्या 1,500 इतकी झाली होती.
हा स्टुडिओ तसा आरामदायक आणि सुसज्ज होता. पण कंपनीच्या पसाऱ्यासोबतच काही समस्याही वाढल्या.
एकसारखेच काम करण्यासाठी कंपनीतल्या काही लोकांना इतरांपेक्षा जास्त वेतन मिळते, ही चिंता मला पोखरते.


कार्टुन चित्रे काढणाऱ्या चित्रकारांच्या संघटनेने डिस्ने स्टुडिओ कंपनीत आपली शाखा सुरू केली. त्यांनी 29 मे 1941 रोजी कंपनीत संप पुकारला.
यादरम्यान, वॉल्ट अमेरिकी सरकारच्या वतीने दक्षिण अमेरिकेचा सद्भावना दौरा करत होता.
WALT DISNEY
पण त्याच्या अनुपस्थितीतच संप मिटला.
संपानंतर वॉल्ट आणि कर्मचारी यांच्यातील दरी वाढली. मग वॉल्ट त्याची पत्नी आणि मुली, *डायने* व *शेरॉन* यांच्यासोबत जास्त वेळ घालवू लागला.
याच काळात, डिस्ने स्टुडिओने *पिनोच्चिओ, फॅन्टासिआ* आणि *बाम्बी* हे सिनेमे बनवले. दर सिनेमागणिक वॉल्ट नवनव्या गोष्टी शिकत गेला.
बाबा, एक गोष्ट वाचून दाखवा. *जिमिनी क्रिकेटचं* चित्रसुद्धा काढा.
बरं बाळांनो, *थंपरचं* चित्र काढू?
एकदा वॉल्ट मुलींना मनोरंजन पार्कमध्ये घेऊन गेला.
संपूर्ण कुटुंबाला मजा करता येईल असं पार्क हवं.
मुली पार्कमधील खेळांची मजा लुटत होत्या तेव्हा वॉल्टला डिस्नेलँडची कल्पना सुचली.

पण तेव्हाच अमेरिकेने दुसऱ्या महायुद्धात प्रवेश केला. अमेरिकी सैन्याने डिस्ने स्टुडिओची जागा सातशे सैनिकांसाठी तळ म्हणून वापरली. त्यामुळे स्टुडिओचे सारे कामकाज बंद पडले.



सैन्य तिथे सात महिने राहिले. मग पुढील तीन वर्षे स्टुडिओने सरकारसाठी शैक्षणिक सिनेमे बनवले. युद्धानंतर वॉल्टने *सिंड्रेला, ॲलीस इन वंडरलँड* आणि *पीटरपॅन* हे सिनेमेदेखील बनवले.

अलास्का दौऱ्यात वॉल्टला *एल्मा* आणि *अल् मिलोट* नावाचे दोन छायाचित्रकार भेटले.





मिलोटने पाठवलेल्या सिनेमांपैकी वॉल्टला *फर-सील*च्या जीवनावरील सिनेमा खूप आवडला.





वर्षभर एका बेटावर राहून मिलोटने तो सिनेमा बनवला होता.



परिणामी, *सील आयलंड* हा खऱ्याखुऱ्या दृश्यांनी युक्त असा पुरस्कारप्राप्त सिनेमा बनला.


सील आयलंडनंतर वॉल्टने मानवी पात्रे वापरून आपला पहिला धडाकेबाज दृश्यांनी भरलेला सिनेमा बनवला.
*ट्रेझर आयलंड* हा सिनेमा इंग्लंडमध्ये चित्रित झाला.
त्यानंतर, सिनेमाच्या कामांतून सुट्टी घेऊन तो आपल्या स्वप्नातील मनोरंजन पार्क डिस्नेलँडवर काम करू लागला. ते साल होते 1952.
तुझ्या कल्पना शुद्ध वेडेपणा वाटतो.
डिस्नेलँडला पाठिंबा मिळवण्यासाठी वॉल्टने *डिस्नेलँड* नावाची एक साप्ताहीक टिव्ही मालिका सुरू केली.
त्याचा जन्म टेनेसी राज्यातील पर्वत शिखरावर झाला....
या मालिकेतील *डेव्ही क्रॉकेट* पात्राने देशभरातील लोकांना वेड लावले.
यानंतर, वॉल्टने *मिकी माऊस क्लब* ही दैनंदिन मालिका सुरू केली.
M-I-C-K-E-Y M-O-U-S-E
या मालिकेत *माऊस्केटीअर्स*, *स्पिन अँड मार्टी* आणि अर्थात प्रसिद्ध *डिस्ने कार्टुन* सिनेमेही दाखवत.


अखेरीस, 1955 साली डिस्नेलँड सुरू झाले. स्टुडिओ बनवताना वॉल्टने जशी काळजी घेतली तशीच काळजी पार्क बनवतानाही घेतली. पार्कमध्ये कृत्रिम कालवे, वृक्षराजी, छोट्या इमारती, बोट आणि मजेदार खेळ होते.
डिस्नेसर, तुम्ही नक्कीच खूप श्रीमंत असणार.
खरंय, माझ्यावर एक कोटी डॉलरचं कर्ज आहे.
पार्क नेहमी स्वच्छ असावा आणि तेथील कर्मचाऱ्यांनी लोकांशी नम्रपणे वागावे, यासाठी वॉल्ट दक्ष असे.
1950 ते 1965 या काळात आलेल्या वॉल्टच्या सिनेमांपैकी *मेरी पॉपीन्स* हा सिनेमा सर्वाधिक यशस्वी ठरला.
या सिनेमाला पाच अकादमी पुरस्कार मिळाले. त्यामुळे वॉल्ट डिस्ने प्रोडक्शन कंपनीला मिळालेल्या एकूण पुरस्कारांची संख्या 29 झाली.


डिस्ने कंपनीचा शेवटचा प्रकल्प ठरला *डिस्ने वर्ल्ड*. हा 27,500 एकर जागेत पसरला होता. त्यात मनोरंजन पार्कपेक्षा खूप जास्त काही होते.
पार्कसभोवती आपण प्रायोगिक तत्वावर भावी पिढ्यांना राहायला आदर्श अशी वस्ती निर्माण करू.
1966 च्या अखेरीस, वॉल्ट डिस्नेला अनेकदा हॉस्पीटलमध्ये दाखल व्हावे लागले. तिथे भेटायला येणाऱ्या लोकांना तो डिस्ने वर्ल्डच्या आपल्या योजनांबाबत सांगत असे.
इथे आपण मोनोरेल बनवू....
वयाच्या 65 व्या वर्षी 15 डिसेंबर रोजी वॉल्ट डिस्नेचे निधन झाले.
त्याच्या अंतिम इच्छेनुसार, वॉल्ट डिस्ने प्रोडक्शन कंपनी सुरुच राहिली. येणाऱ्या अनेक पिढ्यांचे मनोरंजन करण्यासाठी डिस्ने समूहात मिकी, डोनाल्डशिवाय आणखी नवनवीन पात्रे येत गेली.
The END